# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक, गडचिरोली
दिनांक- १७ /१०/२०१८

## उपविभाग पेंढरी संघाने जिंकला वीर बाबुराव शेडमाके कबड्डी चषक

### * जिल्हयातील तब्बल १०३९२ खेळाडुंनी स्पर्धेत घेतला सक्रिय सहभाग *

गडचिरोली पोलीस दलाव्दारे आयोजित करण्यात आलेल्या वीर बाबुराव शेडमाके कबड्डी चषक - २०१८ स्पर्धेतील अंतिम सामना उपविभाग पेंढरी विरुध्द उपविभाग धानोरा संघ यांच्यात काल पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे सायंकाळी ०७:०० वा. खेळला गेला. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या अंतिम सामन्यात शेवटच्या ३० सेकंदात उपविभाग पेंढरी संघाने धानोरा संघावर अवघ्या १ गुणांची आघाडी मिळवत वीर बाबुराव शेडमाके चषक-२०१८ आपल्या नावे केला. धानोरा संघाला उपविजेते पदावर समाधान मानावे लागले हा मनोवेधक आणि चित्तधरारक सामना मा. जिल्हाधिकारी गडचिरोली शेखर सिंग साो, मा.पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे, मा. विजयकुमार राठोड मुख्य कार्यकारी अधिकारी गडचिरोली, मा. महेंद्र पंडित अपर पोलीस अधीक्षक प्रशासन, मा. हरी बालाजी अपर पोलीस अधीक्षक अभियान, मा. मोहित कुमार गर्ग अपर पोलीस अधीक्षक नक्षलसेल गडचिरोली, मा. अजयकुमार बन्सल अपर पोलीस अधीक्षक अहेरी, मा. सचिन ओम्बासे प्रकल्प अधिकारी गडचिरोली, मा. इंदु गर्ग प्रकल्प अधिकारी अहेरी, मा. सपन सुमन डेप्युटी कमांडट सीआरपीएफ, प्रो. कबड्डी लीग खेळाडु श्री. शशांक वानखेडे यांच्या सहित या सामन्यास मोठया प्रमाणात प्रेक्षकवर्ग लाभला होता.

अंतिम सामन्यानंतर बक्षिस वितरण समारंभ सोहळा पार पडला. यावेळी पोलीस संकुल येथील दुर्गा माता महिला संघाने गरबा नृत्य सादर केले. तर महेंद्र अलामी गृप एटापल्ली येथील आदिवासी बांधवांनी अतिशय मनोवेधक असे रेला नृत्य सादर करुन प्रेक्षकांची वाहवा मिळवली यानंतर स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या उपविभाग पेंढरी संघाला २५ हजार रुपये रोख वीर बाबुराव शेडमाके कबड्डी चषक सुवर्णपदक, पुष्पगुच्छ देवुन सन्मानित करण्यात आले. तर उपविजेता ठरलेल्या धानोरा संघास २० हजार रुपये रोख, रोप्य पदक वीर बाबुराव शेडमाके चषक  व पुष्प गुच्छ देवुन गौरविण्यात आले. तर तिस-या स्थानावर समाधान मानावे लागलेल्या उपविभाग हेडरी संघास रुपये १५ हजार रोख कांस्य पदक, वीर बाबुराव सडमेक चषक व पुष्पगुच्छ देवुन सन्मानित करण्यात आले.

सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राखीव पोलीस निरीक्षक श्री. ठाकुर, सिव्हीक ॲक्शन सेलचे प्रभारी अधिकारी अतुल खंदारे, प्रपोगंडा शाखेचे प्रभारी अधिकारी अवधुत शिंगारे, कल्याण शाखेचे प्रभारी अधिकारी नरेंद्र पवार यांनी परीश्रम घेतले.